**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ०९ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. गेल्या ११ वर्षांत १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशाने विविधक्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणलं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन.
2. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणाऱ्या भारत गौरव पर्यटनविशेष गाडीचं मुंबईत उद्‌घाटन, नागपुरात आज शिवराजाभिषेशक सोहळ्याचे आयोजन.
3. 'झाडे लावा प्रमाणपत्र मिळवा' अकोला जिल्ह्यातील मुरंबा ग्रामपंचायतचा स्तुत्य निर्णय.
4. पूर्व विदर्भात उद्या आणि संपूर्ण विदर्भात परवा वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट.

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी-११ वर्ष संदेश**

गेल्या ११ वर्षांत १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक सहभागामुळे देशाने विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणलं आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या अकरा वर्षांत सरकारने लोककेंद्री आणि सर्वांगीण प्रगतीला प्राधान्य दिल्याचं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. जनधन योजनेतून ५५ कोटी जनतेला फायदा झाला आहे, ही संख्या युरोपियन महासंघातल्या देशांच्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. आतापर्यंत ८१ कोटी जणांना मोफत अन्नधान्य पुरवठा करण्यात आला असून ही संख्या अमेरिकेच्या लोकसंख्येएवढी आहे. १५ कोटी घरांना नळाने पाणीपुरवठा करण्यात आला आहे. २५ कोटी शेतकऱ्यांना मृदा आरोग्य योजनेचं कार्डवाटप झालं आहे. सुमारे ४४ लाख कोटी रुपयांची थेट कर्जही मंजूर झाली आहेत. तर मुद्रा योजनेद्‌वारे लघुउद्‌योगांना ५२ कोटींहून अधिक कर्जाचं वाटप करण्यात आलं आहे. भारत आज फक्त सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था नाही तर हवामान बदल आणि डिजिटल नवोपक्रम यासारख्या महत्त्वाच्या मुद्‌द्‌यांवर भूमिका मांडणारा आवाज झाला आहे. भारताच्या विकास यात्रेविषयी

नमो ॲपवर उपलब्ध व्हिडीओ, ग्राफिक्स आणि लेख यांच्या माध्यमातून जाणून घेण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

---------------------------------------------------------------

11 वर्ष-ईशान्य भारत

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळं, भारतानं गेल्या दशकात, उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज श्रोत्यांसाठी, गेल्या अकरा वर्षात, प्रमुख क्षेत्रांमधील सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख-मालिका सादर करत आहे. त्यात आज, ईशान्य भरातातील राज्यांच्या प्रगतीवर आधारित हे वृत्त, देत आहेत, वृत्त विभागातून हेमांगी कुळकर्णी.......

*(होल्ड बाईट)*

*ॲक्ट ईस्ट पॉलिसी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, ईशान्येकडील प्रदेश दुर्लक्षिततेपासून प्राधान्याकडे आला आहे. त्यामुळे गेल्या दशकात ईशान्यकडील राज्यांची वाटचाल एकात्मिकतेकडे झाली आहे. शांतता करारांवर स्वाक्षरी केल्यानं या प्रदेशात शांतता प्रस्थापित होत आहे आणि हिंसाचारात घट झाली आहे. सरकारच्या प्रयत्नांमुळे या प्रदेशात AFSPA ची व्याप्ती कमी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आसाम आणि अरुणाचल प्रदेशाने दशकांपासून चालत आलेला सीमा वाद सोडवण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. दळणवळणात देखील अभूतपूर्व सुधारणा झाल्या आहेत. दहा नवीन ग्रीनफील्ड विमानतळं, मिझोरमसारख्या राज्यांमध्ये नवीन रेल्वे जोडणी आणि ब्रह्मपुत्रा नदीवरील रो-रो फेरी सेवांमुळे गतिशीलता वाढली आहे. बोगीबील पुलासारख्या मोठ्या प्रकल्पांमुळे एकेकाळी दुर्गम असलेले प्रदेश जवळ आले आहेत. पीएम-डिव्हाईन आणि उन्नती-२०२४ यांसारख्या योजना नवीन आर्थिक क्षमता प्रस्थापित करत आहेत. पायाभूत सुविधा आणि उपजीविका वाढविण्यासाठी १ कोटी ३५ लाखांहून अधिक रुपयांचे प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत. जलविद्युत विकासात मोठ्या प्रमाणात भर घालण्यात आली असून १५ हजार मेगावॅट स्वच्छ ऊर्जेचा वापर करण्याच्या दिशेने ईशान्यकेडील राज्यांची वाटचाल सुरु आहे.आज, ईशान्येकडील राज्य फक्त सीमावर्ती भाग नाहीत, तर ते देशाच्या विकासात योगदान देत आहेत.*

---------------------------------------------------------------

भारत गौरव पर्यटन ट्रेन

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणाऱ्या भारत गौरव पर्यटन ट्रेनला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहून हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवर तसंच या पहिल्या गाडीचे प्रवासी उपस्थित होते. शिवराज्यभिषेक दिनाचं औचित्य साधत आज या गाडीचा पहिला प्रवास सुरु झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि स्वातंत्र्याचा इतिहास जिवंत ठेवण्याचं काम या रेल्वेच्या माध्यमातून होणार आहे, हा प्रवास सर्व प्रवाशांसाठी एक प्रेरणादायी अनुभव असेल असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्याच्या विविध भागातून आलेले सातशे पेक्षा जात प्रवासी या रेल्वेतून प्रवास करत आहेत.

---------------------------------------------------------------

शिवराज्याभिषेक सोहळा

नागपूर महानगरपालिका आणि श्री शिवराज्याभिषेक सोहळा समिती यांच्या संयुक्त विद्‌यमाने आज महाल इथल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक 'शिवतीर्थ' इथं हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री विजय शर्मा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. याप्रसंगी त्यांच्यासोबत आमदार प्रवीण दटके, श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन बघून आपण येथे रायगडावरील छत्रपती शिवजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळ्याला आलो असल्याची भावना शर्मा यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल बघायला मिळाली. ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता, ज्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सोहळ्यानिमित्त सादर करण्यात आलेल्या शिवकालीन क्रीडा प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना त्या ऐतिहासिक काळाची आठवण करून दिली. तसेच, शिवराज्याभिषेक महिला मुद्रा पथकाने केलेल्या सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली.

---------------------------------------------------------------

रेल्वे अपघात

मध्य रेल्वेच्या दिवा आणि मुंब्रा स्थानकादरम्यान कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून आज चार प्रवाशांचा मृत्यू झाला तर नऊ जण जखमी झाले. कसाऱ्याकडे जाणाऱ्या गाडीतून दारात

लटकून जाणारे प्रवासी विरुद्ध दिशेने येणाऱ्या गाडीच्या दरवाजात लटकलेल्या प्रवाशांना धडकल्याने हा अपघात झाला, अशी माहिती मध्य रेल्वेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली. भविष्यात असे अपघात होऊ नयेत, याकरता सर्व गाड्या १५ डब्यांच्या करणं, स्वयंचलित दरवाजे बसवणं अशा उपाययोजना करण्यात येतील असं त्यांनी सांगितलं. ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेल्या तीन जखमींचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची माहिती ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी दिली. जखमींना सर्वतोपरी वैद्यकीय मदत केली जात असल्याचे आरोग्य राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले -

*(होल्ड बाईट- केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव ३४ सेकंद)*

*मृतकांच्या नातेवाईकांना सुद्धा मदत देण्यासाठी निश्चित केंद्र सरकार राज्य सरकारकडून मदत करण्याचा प्रयत्न राहील आणि जे जखमी आहे, त्यांच्यावरही हॉस्पिटलमध्ये योग्य ते उपचार करण्यासाठी संबंधितांना त्या ठिकाणी सूचना केल्या जातील. या अगोदर आमचे स्थानिक खासदार आणि आमचे शिवसेनेचे गटनेते माननीय श्रीकांत शिंदे सभांनी सुद्धा त्या ठिकाणी भेट दिली आहे आणि आमचे उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथराव शिंदे साहेबांनी सुद्धा जखमींची पूर्ण काळजी घेण्याच्या बाबतीचे निर्देश या ठिकाणी सर्व हॉस्पिटलमध्ये दिले.*

दरम्यान, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

---

मुरंबा ग्रामपंचायत

वाढते तापमान आणि अनियमित पावसामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय असंतुलनाचा विचार करता मुरंबा,धनोरा आणि तुरखेड गट ग्रामपंचायतने एक स्तुत्य निर्णय घेतला आहे. गावातील प्रत्येक कुटुंबाला दोन झाडे लावून आणि त्याचे संगोपन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयाचे ग्रामस्थांकडून स्वागत होत आहे. मुरंबा ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या मासिक सभेत हा ठराव मंजूर करण्यात आला. या निर्णयानुसार झाडे न लावणाऱ्या आणि संगोपन न करणाऱ्या कुटुंबांना ग्रामपंचायतीमार्फत कोणतेही शासकीय कागदपत्र अथवा प्रमाणपत्र दिले जाणार नाही. पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायततर्फे प्रत्येक कुटुंबाला दोन झाडे मोफत देण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे झाडांचे संगोपन खरेच झाले आहे का? याची

खातरजमा ग्रामपंचायत कडून करण्यात येत आहे मुरंबा ग्रामपंचायत कार्यकारी मंडळांने कडुलिंब, जांभूळ, चिंच, वड अशा सात ते आठ प्रकारच्या बहुपयोगी झाडांसाठी नर्सरीशी संपर्क साधला आहे.

----------------------------------------------------------

हवामान

पूर्व विदर्भातल्या नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उद्या वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला असून, यादरम्यान सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट होऊ शकतो असा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. तर परवा अर्थात अकरा तारखेला संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान आज काही जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहणार आहे. गेल्या 24 तासात सर्वाधिक कमाल तापमान नागपूर इथं 43 अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं त्या पाठोपाठ गोंदिया इथं 42.1 चंद्रपूर, 42 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे.

----------------------------------------------------------

पिण्याच्या पाण्याची सुविधा

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागातील शाळांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ह्युंदाई मोटरच्या सहकार्यानं अडीचशे शाळांमध्ये ही सुविधा सुरू झाली आहे. या उपक्रमातून जवळपास २६ हजार विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या स्वच्छ पाण्यामुळे त्यांचं आरोग्य आणि शिक्षण यामध्ये सकारात्मक सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

----------------------------------------------------------